| ५ | १८-३-२००५ | ४ | मा.स्थायी समिती ठराव क्र.९ दि.२९-११-२००४ - अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम पाणीपुरवठा व नगररचना विभागात कार्यरत असलेल्या अभियंत्याची मंजूर पदसंख्या अपुरी असल्याने म.न.पा.चे कामात गतीमानता कार्यक्षमता आणि परिणामकारक प्रशासनाच्या दृष्टीने आस्थापनेवर जादा (१२) पदे निर्माण करुन त्या जागी प्रति नियुक्तीवर अभियंत्याची पदे भरणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. | ठरविण्यात येते की,महानगरपालिका अस्तित्वात आल्याने कार्यक्षेत्रातील जबाबदारी वाढली असून नागरी सुविधा देण्याचे दृष्टीने व प्रस्तावात नमूद केलेल्या आवश्यकतेचा विचार करता मा.स्थायी समिती ठराव क्र.९ दि.२९-११-०४ अन्वये पुढील पदे प्रतिनियुक्तीवर भरणेबाबत प्रस्ताव मान्यतेसाठी मा.शासनाकडे पाठविणेत यावा. १) अभियंता = पदे १२, २) मुख्य लेखा व वित्त अधिकारी = पद १.ठराव सर्वानुमते मंजूर.तद्नुषंगीक खर्च मंजूर.सुचक : मा.श्री.अभय आगरकर अनुमोदक : मा.श्री.नामदेव पवार | |
| ६ | १८-३-२००५ | ५ | श्री.गोरक्षनाथ द.दरवडे यांच्या नेमणुकी बाबत मा.स्थायी समिती यांनी मंजुर केलेले प्रकरण अखेर मा.महासभेपुढे मंजुरीस्तव सादर. | ऑफिस रिपोर्ट पाहता श्री.दरवडे यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ ( १ ) नुसार लॅब टेक्निशियन या पदावर कायम नेमणुक देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.सुचक : मा.श्री.अभय आगरकर अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके ठराव बहुमताने मंजूर. | |
| ७ | १८-३-२००५ | ६ | अहमदनगर महानगरपालिके मध्ये दि.१-२-२००५ रोजी निवड समितीच्या समोरील मागासवर्गीय अनुशेष व खुल्या प्रवर्गातील भरती अंतर्गत निवड करण्यांत आलेल्या उमेदवारांची यादी अखेर मंजुरीस. | ऑफिस रिपोर्टानुसार अखेर मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार कार्यवाही करावी. सुचक : मा.श्री.दिप चव्हाण.अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके. ठराव सर्वानुमते मंजुर. | |
| ८ | १८-३-२००५ | ७ | शासन निर्णय क्र. अकंप/ १०९३/ | ऑफिस रिपोर्ट मंजुर.संबंधितांस प्रोबेशनरी आदेश देण्यांत यावे.नियमानुसार | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | २३३५/प्र.क्र.-९०/९३/८, दि.२६-१०-१९९४ अन्वये शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या / बेपत्ता झालेल्या / वैद्यकीय कारणास्तव सेवा -निवृत्त केलेल्या कर्मचा-यांच्या एका वारसास अनुकंपा तत्वावर नेमणूक देण्याच्या प्रस्ताव मंजूरीस्तव. | कार्यवाही करावी. सुचक : मा.श्री.दिप चव्हाण.अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर ठराव सर्वानुमते मंजूर . | |
| **९** | १८-३-२००५ | ८ | श्री.संतोष अर्जुन शिंदे यांचा अनुकंपा तत्वानुसार वारस नोकरी मिळणें बाबतचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. | ऑफिस रिपोर्ट मंजुर,संबंधितांस प्रोबेशनरी आदेश देण्यांत यावे.नियमानुसार कार्यवाही करावी. सुचक : मा.श्री.मनेष साठे.अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके ठराव सर्वानुमते मंजूर. | |
| **१०** | १८-३-२००५ | ९ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ यामध्ये " राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदेत बहुसदस्यीय प्रभाग पध्दत रद्य करुन एक सदस्यीय प्रभाग पध्दत सुरु करणें बाबत " झालेले अधिनियम महासभेपुढे माहितीस्तव सादर. | नोंद घेण्यांत येत आहे. | |
| **११** | १८-३-२००५ | १० | नित्यसेवा सोसायटी ते निर्मलनगर पर्यंतच्या रस्त्याला स्वर्गीय डॉ. ना. ज. पाऊलबुधे यांचे नांव देणें बाबत सेवा शिक्षण प्रसारक मंडळ यांचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | " तहकुब " तहकुब ठराव बहुमताने मंजुर.सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव.अनुमोदक : मा.सौ.सविता मोरे. | |
| **१२** | १८-३-२००५ | ११ | रेणावीकर कॉलनी ते पाईपलाईन रोड सावेडी येथील प्रमुख रस्त्यास कै.बंडोपंत कुलकर्णी हे नांव देणें बाबत मा.सर्वश्री अनंत जोशी , मिलींद गंधे,दशरथ शिंदे व सौ. राधा गुरुड यांची यादी व यावर ऑफिस | ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.नियमानुसार कार्यवाही करावी.ठराव मंजुर .सुचक : मा.श्री.अनंत जोशी.अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | रिपोर्ट. | | |
| **१३** | १८-३-२००५ | १२ | सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना पुर्नसर्वेक्षणाची पूर्वतयारी करणेबाबतचा महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचा आदेश माहितीस्तव. | नोंद घेण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी.सुचक : मा.श्री.अभय आगरकर.अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके.ठराव सर्वानुमते मंजूर. | |
| **१४** | ३१-३-२००५ | १ | मागील दि.२०-११-२००४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे आणि दि.७-१२-२००४ व दि.१९-२-२००५ रोजी झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त कायम करणे. | संपूर्ण कार्यवृत्तावर चर्चा करण्यात येवून दि.२०-११-२००४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे आणि दि.७-१२-२००४ व दि.१९-२-२००५ रोजी झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.<br>मात्र अंदाजपत्रकाचे इतिवृत्त कायम करीत असताना नवीन हाती घेतलेल्या रस्त्यांचे यादीमध्ये पुढील कामे समाविष्ट करावीत.<br>मा.श्री.विनीत नाथ पाऊलबुधे, सदस्य यांचे सुचनेप्रमाणे औरंगाबाद रोड ते नामदेव चौक, नित्यसेवा हौसिंग सोसा. ते गुलमोहोर पोलिस चौकी, गुलमोहोर रोड पर्यंतचा रस्ता रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण (साईड ड्रेनेज सहीत) सुशोभिकरण करणे.मा.सौ.शिंदे कांताबाई अरुण, सदस्या यांचे सुचनेप्रमाणे प्रभाग क्र.६ मध्ये बुरुडगांव रोड येथे महानगरपालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट लगत पुढील मोकळया जागेमध्ये गाळयांचे बांधकाम करणे.ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक : मा.श्री.अनंत जोशी.अनुमोदक : मा.श्री.दिपक सूळ. | |
| **१५** | ३१-३-२००५ | ४ | मुकुंदनगर ते फकिरवाडा पाणीपुरवठा योजना ८ इंची पाईपलाईन व १० लाख लिटर्स क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणेबाबत ऑफिस रिपोर्ट | मुकंदनगर ते फकिरवाडा पाणी पुरवठा योजना पाईपलाईन टाकणे व उंच टाकी बांधणे या प्रस्तावास पुढील बाबींच्या समावेशासह मान्यता देत आहे.१.अंदाजपत्रकानुसार व प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे १० % लोक वर्गणी भरणेंस ही सभा मान्यता देत आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता मा.शासनाने उर्वरित संपूर्ण रक्कम सदरच्या पाणीपुरवठा योजनेकरीता उपलब्ध करुन देणेंस्तव मा.शासनांस विनंती करणेंत यावी.२.मा.शासन यंत्रणेकडुन सदरचे काम केल्यास सुपरव्हिजन चार्जेस व तदनुषंगिक बाबींचा १७ % वाढीव खर्च अपेक्षित आहे. याकरीता महानगरपालिकेच्या माध्यमांतून सदरचे काम करणेंत यावे.खर्च मंजुर.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.अनंता जोशी.अनुमोदक : मा.श्री.शेख मुदस्सर अहमद इसहाक. | |
| **१६** | ३१-३-२००५ | ५ | डॉ.एन.जी.कुलकर्णी, आरोग्याधिकारी, अहमदनगर | डॉ.एन.जी.कुलकर्णी, आरोग्याधिकारी, अहमदनगर महानगरपालिका यांचे वय मर्यादा शिथील करणेच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत असून मा.शासनाकडे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | महानगरपालिका यांचे वय मर्यादा शिथील करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | प्रस्ताव पाठविणेस देखील ही सभा शिफारस करीत आहे.सुचक : मा.श्री.दिपक सुळ.अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर.ठराव सर्वानुमते मंजूर. | |
| **१७** | २०-४-२००५ | १ | मागील दि.१८-३-२००५ आणि ३१-३-२००५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणें. | ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक : मा.श्री.-------अनुमोदक : मा.श्री.---- | |
| **१८** | २०-४-२००५ | ३ | विस्तारीत अंत्योदय अन्न योजना ,अतिरिक्त लाभार्थी अन्न योजनेसाठी अन्नधान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी निवडलेल्या नावांच्या यादीस मान्यता मिळणें बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफीस रिपोर्ट मंजूर नियमानूसार कार्यवाही करणेत यावी. परंतु अन्न धान्य वितरण अधिकारी यांनी तयार केलेल्या यादी व्यतिरिक्त अनेक लाभधारक आहेत यांचाही सर्व्हे करण्यात यावा.व समावेश करावा अशाबाबत कळविण्यात यावे.ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक - श्री सुरेश शेळके, अनुमोदक - श्री कैलास गिरवले, | |
| **१९** | २०-४-२००५ | ४ | हॉटेल प्रेमदान चौक ते प्रोफेसर कॉलनी चौकापर्यंतच्या रस्त्यास " महर्षि दधिची ऋषी " नांव देणें बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टनुसार प्रेमदान चौक ते पंडीत दिनदयाळ चौक पर्यंतचे रस्त्यास "दधिची ऋषी पथ" असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी. खर्च मंजूर.यापूर्वी देण्यात आलेल्या रस्त्यांच्या नांवाचे बोर्ड करुन घ्यावेत व १ महिन्याचे आत संबंधीत ठिकाणी सदरचे बोर्ड लावण्याची नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. खर्च मंजूर.ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक : मा.श्री.मिलींद गंधे.अनुमोदक : मा.श्री.अनंत जोशी. | |
| **२०** | २०-६-२००५ | १ | मा.शासनाचे जकात कर लागू करणे बाबतचे दिनांक ३१ मार्च २००५ चे पत्रानुसार जकात कर लागू करणे बाबत विचार विनीमय करणे, जकात लागू करावयाची झाल्यास जकात वसुली साठीच्या प्रक्रिये बाबत धोरण ठरविणे तसेच जकात नियमाच्या मसुदयास मान्यता | जकात कर याच वर्षात सुरू करणे बाबत प्रशासनाने पाठपुरावा केला आहे. प्रशासनाने कलम १०४ प्रमाणेही प्रस्ताव स्थायी समितीला दिला आहे. कलम १०४ व १५०अन्वये चालू वर्षाच्या उर्वरित कालावधीत कर लावण्यांस महानगरपालिका सक्षम असल्याने सत्वर जकात लावण्यांस मंजूरी देणेंत येत आहे. त्याचप्रमाणे नियमांच्या मसुदयासही व स्थायी आदेशासह आवश्यक तरतुदीसह आवश्यक सुधारणांसह मंजुरी देण्यांत येत आहे.आयुक्तांनी कायदेशिर बाबींची पुर्तता करावी. तात्काळ जकात सुरू करणें बाबत प्रक्रिया पार पाडावी.ठराव बहुमताने मंजूर. नियमानुसार कार्यवाही करावी.सुचक : मा.श्री.दिपक सुळ.अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. | | |
| **२१** | २०-६-२००५ | १ ब | मा.शासनाचे जकात कर लागू करणे बाबतचे दि.३१मार्च २००५ चे पत्रानूसार जकात कर लागू करणेबाबत विचारविनिमय करणे जकात लागू करावयाची झाल्यास जकात वसुलीसाठीच्या प्रक्रियेबाबत धोरण ठरविणे. तसेच जकात नियमाच्या मसुद्यास मान्यता देणेबाबतचा ऑफीस रिपोर्ट. | नियमांना शासनाची मान्यता प्राप्त झाल्यावर कर्मचा-यांमार्फत आयुक्तांनी त्वरीत जकात वसुली सुरु करावी व अभिकर्ता नेमणुकीसाठी विषय तात्काळ खास सभेपुढे सादर करावा.ठराव बहुमताने मंजुर.नियमानुसार कार्यवाही करावी.सुचक - मा.श्री.अनंत जोशी.अनुमोदक - मा.श्री.बहिरनाथ वाकळे | |
| **२२** | २०-६-२००५ | २ | अहमदनगर शहर एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणे बाबत मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ, मुंबई यांचेकडील पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्ट प्रमाणे मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ,मुंबई यांचेकडून महानगरपालिकेस शहरातील प्रमुख रस्ते तयार करण्यांच्या धोरणांस व त्यास अनुषंगुन तयार केलेल्या प्रस्तावास ही सभा तत्वत : मान्यता देत असुन या संदर्भात रस्ते करण्यांसाठी निश्चितता असावी याकरीता मा.महापौर,मा.आयुक्त,मा.उपायुक्त (कर ) मा.उपायुक्त (सामान्य) तसेच नगर अभियंता, नगर रचनाकार, व पुढील मा.सदस्य<br>१. मा.श्री.ज्ञानेश्वर सदाशिव खांडरे, उपमहापौर<br>२. मा.श्री.मनेष दशरथ साठे, सभापती,स्थायी समिती<br>३. मा.श्री.सुरेश छबुराव शेळके,सभागृह नेता<br>४. मा.श्री. नामदेव शांताराम पवार,नगरसेवक<br>५. मा.श्री.भानुदास एकनाथ कोतकर, नगरसेवक<br>यांची समिती गठित करणेंत यावी. तसेच सदरच्या रस्त्याकरीता प्लॅन एस्टीमेंट तसेच तदनुषंगिक खर्चास मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी. ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री. दिपक सुळ.अनुमोदक : मा.श्री. मिलिंद गंधे. | |
| **२३** | १९-७-२००५ | २ | अहमदनगर महानगरपालिकेचे ग्रामपंचायती कडील थकीत पाणीपट्टी बीले वसुली कामी अशुध्द पाणी पुरवठा आकार कमी करुन | ठरविण्यांत येते की,ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरहू ग्रामपंचायतीचा दर हा अशुध्द पाण्यासाठीचा लावण्यांस मंजूरी देण्यांत येत असून हा दर रू.५ /- प्रति १००० लि.असा राहिल. याप्रमाणे संबंधितांकडे सुधारित मागणी करावी. सुधारित पाणीपट्टीची मागणी पूर्ण भरलेनंतर थकबाकीवरील | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | त्याप्रमाणे सुधारित मागणी करुन ती भरल्यानंतर दंडनिय व विलंब आकार माफ करणें बाबत मा.स्थायी समितीचे शिफारसी नुसार ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ | दंडनिय व्याज व विलंब आकार माफ करावा. मात्र सदरच्या संस्थेकडे असलेली थकबाकी वसुली कालबध्द कार्यक्रमाचे नियोजन होणेची आवश्यकता लक्षात घेता महापौर यांचे अध्यक्षतेखाली सदर विषयाकरीता बैठक आयोजित करणेंत यावी. त्यामध्ये सर्व पदाधिकारी, मा.आयुक्त , मा.उपायुक्त (सामान्य) मा.उपायुक्त (कर) ,मेकॅनिकल इंजिनिअर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडील व जिल्हा परिषदेकडील संबंधित अधिकारी यांची बैठक बोलविण्यांत यावी.सदर बैठकीस मा.नामदार श्री.जयंत पाटील,वित्तमंत्री,महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री,अहमदनगर ,मा.जिल्हा विधानसभा सदस्य (शहर व तालुका) यांचे उपस्थितीत योजना जाहीर करणेसाठी या सन्माननियांनाही विनंतीपत्र पाठविण्यात यावीत.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.मिलींद स.गंधे,अनुमोदक : मा.श्री.दिपक व.सुळ | |
| **२४** | १९-७-२००५ | ३ | मे.गॅरीसन इंजिनीअर, एम. ई. एस. अहमदनगर यांना पुरविण्यात येणा-या पाणी पुरवठयाचा दर कमी करणेबाबत. | ऑफिस रिपोर्ट मंजुर ठराव सर्वानुमते मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.सुचक :मा.श्री.सुरेश छ.शेळके,अनुमोदक :मा.श्री.मिलींद स.गंधे, | |
| **२५** | १९-७-२००५ | ४ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी शहरामध्ये प्रवासी बससेवा बी. ओ. तत्वावर निविदा मागवून सुरु करणें बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्ट मंजुर ठराव सर्वानुमते मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी. सुचक : मा.श्री. मनेष द.साठे, अनुमोदक : मा.सौ.कांताबाई अ.शिंदे, | |
| **२६** | ११-८-२००५ | १ | मागील दिनांक २०/४/०५ चे सर्वसाधारण सभेचे व १६/७/०५ तसेच १९/७/०५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे | संपूर्ण कार्यवृत्तावर चर्चा करण्यात येवून दि.२०-४-२००५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे आणि दि.१६-७-२००५ व दि.१९-७-२००५ रोजी झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक : मा.श्री.सुरेशराव शेळके.अनुमोदक : मा.श्री.अनंत जोशी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २७ | ११-८-२००५ | ३ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमुन वसुली करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस प्रस्तावानुसार जकात अभिकर्ता नियुक्तीस व त्यासाठीच्या अटी शर्तींना मंजुरी देण्यांत येत आहे. आयुक्तांनी त्वरीत अभिकर्ता नियुक्तीसाठी कार्यवाही करावी. सन १९९९ पुर्वी तत्कालीन नगरपरिषद व अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड संयुक्तपणे जकात वसुल करत होते. त्यामुळे भविष्यात असा निर्णय झाल्यास अभिकर्ता नियुक्तीच्या अटीशर्ती मध्ये कॅन्टोन्मेंन्टला देय ठरणांरी रक्कमेपैकी ठेकेदारीच्या काळातील देय रक्कम अभिकर्त्यास अतिरिक्त रक्कम देकार रक्कमेपेक्षा जास्त द्यावी लागेल अशी अटी शर्तीत तरतूद करावी. तसेच त्यास कॅन्टोन्मेंटचे क्षेत्रात नियमानुसार जकात वसुलीचेही अधिकार देण्यांत यावेत. सुचक : मा.श्री.दिपक वसंत सुळ .अनुमोदक : मा.श्री.मिलिंद सदाशिव गंधे. ठराव बहुमताने मंजुर. | |
| २८ | ११-८-२००५ | ४ | महिला व बाल कल्याण समितीस समितीचा निर्णय अंतिम असेल अशा बाबतचे अधिकार प्रदान करणेबाबत म.बा.स.ठराव नंबर १ दिनांक २१/५/०५ अंतिम मंजूरीसाठी सादर. | सदर विषयाबाबत इतर महानगरपालिकांची माहिती मागविण्यांत यावी. व शासन निर्णयाप्रमाणे कामकाज करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.सुरेश शेळके,<br>अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे. | |
| २९ | ११-८-२००५ | ५ | अभिन्यास ( लेआऊट ) मंजुर करतांना ठरविलेली अंतर्गत सुधारणा रक्कम महानगरपालिकेत भरणे बाबत मा.सर्वश्री वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता,कानडे अशोक नाथा,बारस्कर पोपटराव जगन्नाथ,यांची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट. | या विषयावर साधक बाधक चर्चा होवून ठरविण्यांत येते की,अभिन्यास (ले आऊ ट) मंजूर करतांना नियमाप्रमाणे ठरविण्यांत आलेली अंतर्गत सुधारणा रक्कम महानगरपालिका फंडात जमा करावी. सदरची रक्कम संबंधीत अभिन्यासासाठीच्या कामाकरिताच खर्च करण्यांत यावी व अभिन्यास धारकांने रक्कम महानगरपालिकेत भरणा केल्यानंतर जास्तीत जास्त २ महिन्यांचे आत सदर कामाबाबत संपूर्ण कार्यवाही अंतिमरित्या झाली पाहिजे या तत्वावर सदर विषयाबाबत प्रशासनाने उचित निर्णय घेण्यांबाबत कार्यवाही करावी. तसेच सदरची कामे जाहिर निविदा मागवून करित जावी. सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार रेखांकनाच्या तात्पुरत्या मंजुरीच्या वेळी विकासभार व अंतर्गत सुधारणा रक्कम (गटारीसाठी संपुर्ण रक्कम व रस्त्यासाठी पर्यवेक्षण शुल्क) वसुल करण्यांत येत आहे. तथापि आता सर्व अंतर्गत सुधारणेची कामे महानगरपालिका स्वतः करणांर असल्यांने अंतर्गत सुधारणेपोटीची रक्कम रेखांकन अंतिम मंजुरीच्या वेळेस वसुल करण्यांत यावी. तसेच अंतिम मंजुरी नंतर सदर भागामध्ये ट्री गार्ड बसविणे, पावसाच्या पाण्याचा निचरा होणे,सौर उर्ज्रा वापर व ओपन स्पेस विकसित करणे या सर्व कामांना प्राधान्य ठेवण्यांत यावे सदरची कामे केल्यानंतरच पदाधिका-यांच्या निदर्शनांस आणावे रस्त्याचे काम झाल्यानंतर सदर जागा मालक / विकासक यांची काम पुर्ण केल्याबाबत स्वाक्षरी घेण्यांची योग्य ती तजविज | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | करण्यांत यावी. या ठरावाबाबत मा.आयुक्त व नगर रचनाकार यांनी याबाबतच्या सर्व कायदेशीर बाबी तपासून घेवून ठरावाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.अभय आगरकर, अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके. | |
| **३०** | ११-८-२००५ | ६ | डॉ.श्री.जी.जी.जगताप,वैद्यकिय आरोग्याधिकारी यांचे सेवेची सध्या महानगरपालिकेस आवश्यकता नसल्याने त्यांची नेमणुक इतरत्र करणेसाठी मा.शासनास विनंती करणे बाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता यांची दिनांक ६-८-२००५ ची यादी. | सदर विषयाबाबत प्रशासनाने उचित निर्णय घेणेंत यावा.ठरावा सर्वानुमते मंजुर.<br>सुचक : मा.श्री.अभय आगरकर अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके. | |
| **३१** | १३-९-२००५ | **१** | मागील दिनांक ११-८-०५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणें. | संपूर्ण कार्यवृत्तावर चर्चा करण्यात येवून दि.११-८-२००५ रोजी झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.चर्चेत सुचविल्याप्रमाणे ठरावात दुरुस्ती करुन घेणेबाबत मंजूरी देण्यात येत असून, नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक : मा.डॉ.सौ.योगिता रंजित सत्रे, अनुमोदक : मा.श्री.सुरेशराव छबुराव शेळके | |
| **३२** | | **३** | अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नियुक्तीच्या निविदेस मंजूरी देणेबाबत ऑफीस रिपोर्ट. | अहमदनगर महानगरपालिकेच्या जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणुकीच्या निविदा प्रस्तावावर मा.महासभेत सर्व सभासदांची साधक बाधक चर्चा होउन्न असे ठरविण्यांत आले की,मे.श्री.साई एंटरप्रायजेस , उल्हासनगर यांची स्पर्धात्मकदृष्टया सर्वात जास्त असलेली देकार रक्कम रू.४०,४१,००,००० /- ची निविदा स्विकारणे बाबतचा प्रस्ताव मतदानासाठी टाकण्यांत आला. मतदान हात वर करून घेण्यांत आले. त्यामध्ये ठरावाच्या बाजुने खालील २८ सदस्यांनी मतदान केले.<br>अ.नं. — नांव<br>१ — मा.श्री.फुलसौंदर भगवान प्रल्हाद<br>२ — मा.श्री.खांडरे ज्ञानेश्वर सदाशिव<br>३ — मा.श्री.शेळके सुरेश छबुराव | |

| | |
|---|---|
| ४ | मा.श्री.साठे मनेष दशरथ |
| ५ | मा.सौ.सत्रे योगिता रंजित |
| ६ | मा.श्री.सुळ दिपक वसंतराव |
| ७ | मा.श्री.मैड सतिष बबनराव |
| ८ | मा.श्री.दातरंगे अर्जुन भाउत्र्साहेब |
| ९ | मा.सौ.सय्यद वर्षा अरिफ |
| १० | मा.सौ.शेख सुरैय्या लियाकत |
| ११ | मा.सौ.साहनी सुनिता राकेश |
| १२ | मा.सौ.मोरे सविता दिलीप |
| १३ | मा.श्री.बारस्कर पोपट जगन्नाथ |
| १४ | मा.श्री.डागवाले किशोर आसाराम |
| १५ | मा.श्री.कावरे आसाराम हरिभाउत्र |
| १६ | मा.श्री.गंधे मिलिंद सदाशिव |
| १७ | मा.श्री.कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद |
| १८ | मा.श्री.तिवारी सुरेश रतनप्रसाद |
| १९ | मा.श्री.बोरूडे अनिल वसंतराव |
| २० | मा.सौ.गुंदेचा मंगला सतिष |
| २१ | मा.सौ.सकट पवित्रा भाउत्र |
| २२ | मा.सौ.दहिफळे कविता अशोक |
| २३ | मा.सौ.शिंदे कांताबाई अरूण |
| २४ | मा.सौ.शेंडगे रोहिणी संजय |
| २५ | मा.सौ.गुरूड राधा रमेश |
| २६ | मा.सौ.बिज्जा अर्चना संतोष |
| २७ | मा.सौ.मुदगल सुनिता दत्तात्रय |
| २८ | मा.बोरूडे इंदुबाई परशुराम |

तसेच ठरावाचे विरोधात खालील २४ सदस्यांनी मतदान केले.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १ | मा.श्री.कोतकर भानुदास एकनाथ |
| २ | मा.श्री.बोरा किशोरकुमार हिंमतलाल |
| ३ | मा.श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण |
| ४ | मा.श्री.उडाणशिवे भाउत्साहेब भिमाजी |
| ५ | मा.श्री.शिंदे दशरथ बाबु |
| ६ | मा.श्री.जाधव कृष्णा दत्तात्रय |
| ७ | मा.श्री.सय्यद सादिक अरिफ |
| ८ | मा.सौ.भागानगरे मनिषा प्रकाश |
| ९ | मा.श्री.चव्हाण दिप नारायण |
| १० | मा.श्री.गव्हाळे विजय नाना |
| ११ | मा.श्री.खैरे दिपक साहेबराव |
| १२ | मा.श्री.कोतकर सुनिल रामदास |
| १३ | मा.श्री.कोतकर संदिप भानुदास |
| १४ | मा.श्री.जगताप नितीन विलास |
| १५ | मा.श्री.शेख मुद्स्सर अहमद इसहाक |
| १६ | मा.श्री.पवार नामदेव शांताराम |
| १७ | मा.सौ.दिघे विमल रामचंद्र |
| १८ | मा.कांबळे मंगला राजकुमार |
| १९ | मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब |
| २० | मा.श्री.लोंढे संजयकुमार पांडुरंग |
| २१ | मा.श्री.चोपडा संजय फुलचंद |
| २२ | मा.श्री.खान समद वहाब |
| २३ | मा.श्री.कुरेशी मुश्ताक इब्राहिम |
| २४ | मा.श्री.शेख अरिफ शेख रफिउद्यीन |

सदरचा ठराव २८ विरूध्द २४ मतांनी मंजुर करण्यांत आला. सदरची ठेका पध्दती दिनांक १-१०-२००५ पासुन १ वर्षाकरीता देण्यांस मंजुरी देण्यांत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | येत आहे. नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.ठराव बहुमताने मंजुर.सुचक : मा.श्री.शेळके सुरेश छबुराव. अनुमोदक : मा.श्री.गंधे मिलिंद सदाशिव. | |
| **३३** | ८-११-२००५ | १ | मागील दिनांक १३-९-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे | मागील दिनांक १३-९-२००५ रोजी झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.ठराव सर्वानुमते मंजूर. | |
| **३४** | ८-११-२००५ | ३ | प्रश्नोत्तरे - | प्रश्नांची उत्तरे वाचुन दाखविणेंत आली. | |
| **३५** | ८-११-२००५ | ४ | धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व थोर सेनानी महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेबाबत मा.श्री.शिंदे अनिल माधवराव नगरसेवक यांची यादी. | सदर विषयावर साधक बाधक चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, सन १९९७ साली नेप्ती नाका चौक आयलंड या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणे बाबत ठराव पारीत झाला. त्यानुसार निविदा मागवून कार्यारंभ आदेश देण्यांत आले. परंतु पुढील कार्यवाही झालेली दिसुन येत नसलेने सदर प्रकरणाची पुढील योग्य ती कार्यवाही त्वरीत सुरू करावी. मा.शासनाच्या नियमाप्रमाणे पुतळया बाबतच्या सर्व कार्यवाही करणेत यावी व नेप्ती नाका चौक या ठिकाणी पुतळा बसविणे तसेच संभाजी महाराजांचे चौकास नांव देण्यांबाबत पारित झालेल्या ठरावाप्रमाणे बोर्ड लावण्यांबाबत देखील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी. थोर सेनानी महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा तयार करणे बाबत सविस्तर प्रस्ताव तयार करणेंत यावा. सदर पुतळयासाठी सर्व आवश्यक बाबी तपासून महालक्ष्मी उद्यान किंवा मिस्कीन मळा परिसर या ठिकाणची योग्य जागा निवडण्यांत यावी.उचित कार्यवाही करण्यांत यावी. ठराव सर्वानुमते मंजुर.<br>सुचक : मा.श्री.सुरेश शेळके. अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे. | |
| **३६** | ८-११-२००५ | ५ | भुषणनगर चौक ते डायमंड बेकरी ते दत्त चौक ,वैष्णवनगर या रस्त्यांस धर्मवीर संभाजी राजे यांचे नाव देणेबाबत. मा.सर्वश्री. कोतकर संदीप भानूदास , नगरसेवक , लोंढे संजय पांडुरंग ,नगरसेवक,कांबळे मंगला राजकुमार , नगरसेविका, | ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर. रस्ते चौक यांना नामकरणांचे फलक लावणे बाबत यापुर्वीच्या ठरावानुसार ज्या कार्यवाही अपुर्ण असतील त्या सर्वच कार्यवाही प्राधान्याने व लवकरात लवकर पुर्ण करणेंत यावी. तसेच स्वतंत्ररित्या अभियंता यांचेवर हि जबाबदारी निश्चित करावी. मल्हारराव गिरमे पाटील मार्ग यांचे बोर्डा बाबत देखील उचित कार्यवाही करणेत यावी. तसेच सदरची नामकरणाची नांवे राजपत्रात प्रसिध्द करणेंत यावी. ठराव सर्वानुमते | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | राहिंज कमल बापु, नगरसेविका, कोतकर सुनिल रामदास, नगरसेवक, गव्हाळे विजय नाना, नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | मंजूर. सुचक : मा.श्री.मिलिंद गंधे. अनुमोदक : मा.श्री.कैलास गिरवले. | |
| **३७** | ८-११-२००५ | ६ | बंगाल चौकी ते मार्केट यार्ड चौक पर्यंतच्या रस्त्यांला अमर शहीद थोर संत कंवरराम साहेब यांचे नाव देणेबाबत.मा.श्री.घुले अविनाश हरिभाऊ यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर. सर्वच नामफलक लावणे बाबत सत्वर कार्यवाही करणेंत यावी. ठराव सर्वानुमते मंजूर. सुचक : मा.श्री.कैलास गिरवले. अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे. | |
| **३८** | ८-११-२००५ | ७ | गंज बाजारातील नवा मराठा ते मोहन ट्रंक डेपो पर्यंतच्या रस्त्यांस "कै.धर्मवीर जगदिश भोसले मार्ग " असे नाव देणेबाबत मा.श्री.मैड सतिष बबनराव नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर. सर्वच नामफलक लावणे बाबत सत्वर कार्यवाही करणेंत यावी. ठराव सर्वानुमते मंजूर. सुचक : मा.श्री.कैलास गिरवले.अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे. | |
| **३९** | ८-११-२००५ | ८ | श्रीमत तृप्ती राकेश चव्हाण ,हिस अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणे बाबतचा ऑफीस रिपोर्ट. | प्रस्तावित नेमणुकीस मंजुरी देण्यांत येत आहे. भविष्यात अनुकंपा तत्वावरील वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणां-या वारसांना प्रशासकिय पातळीवर छाननी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देण्यांसही मंजुरी देण्यांत येत आहे. यासाठी होणां-या वेळोवेळीच्या खर्चासही मंजुरी प्रदान करण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.सुरेश शेळके अनुमोदक : मा.श्री.मनेष साठे, | |
| **४०** | ८-११-२००५ | ९ | श्री.उध्दव गोविंद म्हसे यांना गार्डन सुप.या रिक्त पदावर नेमणूक करणेबाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयास्तव. | ऑफिस रिपोर्ट पाहता श्री.उध्दव गोविंद म्हसे, यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) नुसार गार्डन सुपरिटेंडेंट या पदावर नेमणुक देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. ठराव सर्वानुमते मंजुर. सुचक : मा.श्री.सुरेश शेळके, अनुमोदक : मा.श्री.मनेष साठे, | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **४१** | ८-११-२००५ | १० | सिव्हील ड्राप्समन या पदावर नेमणुक मिळणें बाबत श्री.सुरेश कोंडीबा इथापे यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्ट पाहता श्री.सुरेश कोंडिबा इथापे, यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) नुसार सिव्हील ड्रॉप्समन या पदावर नेमणुक देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.ठराव सर्वानुमते मंजुर. सुचक : मा.श्री.मनेष साठे, अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके, | |
| **४२** | ८-११-२००५ | ११ | अहमदनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणां मार्फत राबविणे कामी मा.शासनाचे पत्रा प्रमाणे लोक - वर्गणीची रक्कम भरणे बाबत तसेच कर्जाची रक्कम उभारणीस्तव मान्यता देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | मा.शासनाकडे १० % लोक वर्गणी भरावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूरनियमानुसार पुढील कार्यवाही करणेंत यावी. ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक : मा.श्री.दिपक सुळ.अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके. | |
| **४३** | ८-११-२००५ | १२ | सावेडी स.नं.२१३ / २, २०६ / १ ब / १ अ, २०६ / १ ब / २ / १ मधील खुली जागा वनस्पती उद्यान व आरोग्य प्रकल्प विकसित करणेंसाठी मिळणें बाबत डॉ.राजा ठाकुर,आयुर्वेद व्यासपीठ,शाखा नगर यांचा दिनांक १५-२-०५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. | साधक बाधक चर्चा होवुन ठरविण्यांत येते की, मा.सर्व साधारण सभा ठराव क्र.१३ दिनांक २०-२-२००४ अन्वये जागा न देण्यांचे धोरणांबाबत पारित केलेला ठराव प्रथमत : रद्य करणेंत येत असुन सावेडी स.नं.२१३ / २, २०६/ १ ब, १ अ २०६ / १ ब /२ / १ मधील खुली जागा ऑफिस रिपोर्ट नुसार ३ वर्षे कराराने हस्तांतरण करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करणेंत यावी.ठराव सर्वानुमते मंजुर. सुचक : मा.श्री.अनंत जोशी. अनुमोदक : मा.श्री.दिपक सुळ. | |
| **४४** | ८-११-२००५ | १३ | महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधिन करणे , श्रेणीवाढ व नियंत्रण ) अध्यादेश २००१नुसार गुंठेवारी प्रकरणे सादर करणेंस मुदतवाढ देणे बाबत मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता, यांची दि.२६-७-२००५ ची | साधक बाधक चर्चा होवुन ठरविणेत येते की, महानगरपालिकेचे यापुर्वी गुंठेवारी विकास नियमाधिन करणे , श्रेणीवाढ व नियंत्रण अध्यादेशानुसार सदरची कार्यवाही करणेंस यापुर्वी दिलेली मुदत वाढ विचारात घेवून ठरावाचे तारखेपासुन आणखी ६ महिने मुदत वाढ ही सभा देत आहे. प्रथम महानगरपालिका ठरावाचे यापुर्वी ज्यांनी गुंठेवारी प्रकरणे निपयमीत करतांना जादा रक्कमा भरलेल्या असतील त्यांचे अर्जानुसार तफावतीची रक्कम नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने परतावा करावी. मात्र तत्पुर्वी त्यांचेकडुन महानगरपालिकेची रक्कम घेणे असेल तर त्याचे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. | वसुलीस प्राधान्य देण्यांत यावे. खात्री नंतरच परतावा प्रक्रिया करणेंत यावी. मात्र सदरची प्रकरणे नियमित करणेसाठी एकुण प्रकरणे त्यातुन निकाली निघालेली संख्या नगण्य असल्याचे दिसते.याकरीता या कामी माहितगार अशा कर्मचा-याची मानद नेमणुक करणेंस देखील मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.दिपक सुळ.<br>अनुमोदक : मा.श्री.बहिरनाथ वाकळे. | |
| **४५** | ८-११-२००५ | १४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध आरोग्य केंद्रामध्ये होमिओपॅथिक बाहयरूग्ण विभागा साठी जागा मिळणें बाबत मा.प्राचार्य अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल,सावेडी रोड, अहमदनगर यांचा दिनांक २३-८-२००५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्ट मंजुर.तदनुषंगिक खर्च मंजुर. तळ मजल्यावरील इमारतीचा भाग व यापुर्वीची मनपा मार्फतची सेवा पहिल्या मजल्यावर पुर्वी प्रमाणेच नागरिकांसाठी ठेवणेंत यावी. प्रायोगिक तत्वावर ११ महिनेचा करार करणेत यावा.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.सौ.योगिता र.सत्रे.अनुमोदक : मा.श्री.दिप चव्हाण. | |
| **४६** | ८-११-२००५ | १५ | अहमदनगर शहरातील आयात होणां-या भाजीपाला व दुधावरील जकात माफ करणे बाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव, सभागृह नेता व श्री.राठोड राजेंद्र रामनारायण , शिवसेना गटनेते यांची दिनांक २०-१०-२००५ रोजीची यादी . | महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका हद्यीत कुठेही दुध व भाजीपाल्यावर जकात नाही. त्याप्रमाणे सभागृहात सर्वच सदस्यांनी या विषयावर झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार सर्वानुमते दुध व भाजीपाल्यावर जकात माफ करण्यांत यावी. तसेच इतर जीवनावश्यक वस्तु धान्य (ज्वारी, बाजरी व गहु ) जनावरांचा चारा, अंबाडी या वस्तुंवरही जकात माफ करण्यांत येत आहे. वरील मालापासुन येणांरी जकातीची तुट भरून काढणेसाठी पारगमन पास फी रू.२० ऐवजी रू.४० /- करण्यांत यावी. तसेच १० चाकी व त्यापुढील मोठया वाहनावर प्रतिवाहनास रूपये ६० /- पारगमन फी आकारणी करणेंस मंजुरी देण्यांत येत आहे. सदर बाबत जकात अभिकर्ता यांचेशी मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांनी योग्य तो करारनामा करावा व अंमलबजावणी करावी. नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही त्वरीत करण्यांत यावी. मात्र एस्कॉर्ट फी मध्ये वाढ करण्यांस खालील सदस्यांनी विरोध केला.१.मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम २.मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत<br>३.मा.श्री.कानडे अशोक नाथा ४.मा.श्री.घुले अविनाश हरिभाउ.५. मा.श्री.बोरा किशोरकुमार हिम्मतलाल ६.मा.श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण बहुमताने ठराव | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | मंजुर सुचक : मा.श्री.सुरेश शेळके.अनुमोदक : मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी. | |
| **४७** | १४-१२-२००५ | १ | मागील दिनांक ८-११-२००५ रोजीच्या झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणे. | मागील दिनांक ८-११-०५ रोजीच्या झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यत येत आहे.ठराव बहुमताने मंजुर.सुचक : मा.श्री.सुरेश शेळके.अनुमोदक : मा.श्री.दिपक सुळ. | |
| **४८** | १४-१२-२००५ | ३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिन अहमदनगर - महानगरपालिका ,स्थायी समिती , प्रभाग समिती व महिला व बालकल्याण समिती इत्यादी सभांचे कामकाज प्रारुप नियमांस मंजुरी मिळणें बाबत. | ऑफिस रिपोर्ट मंजुर,नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.खर्च मंजुर.ठराव बहुमताने मंजुर.सुचक : मा.श्री.इंदुबाई परशुराम बोरुडे.अनुमोदक : मा.सौ.योगिता रणजित सत्रे. | |
| **४९** | १४-१२-२००५ | ४ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००५-२००६ च्या अंदाजपत्रकात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ व १०३ अन्वये उचित फेरबदल करुन सन २००५-२००६ चे सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी मिळणें बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव . | १.लालटाकी / सिध्दार्थनगर येथे पाण्याची उंच टाकी बांधणेंचे कामी रू.२५ लाखाची तरतुद मागासवर्गिय कल्याणकारी योजनेच्या ५ टक्के रक्कमेमधुन खर्च करण्यांत यावी.२.कै.बा.दे.दवाखान्यामध्ये लिफ्ट बसविणेंकामी रू.२० लाखाची तरतुद महिला व बालकल्याण कार्यक्रम योजनेच्या रक्कमेमधुन खर्च करण्यांत यावा.<br>मा.सर्वसाधारण सभेने मंजुर केलेले सन २००५-२००६ चे सुधारित अंदाजपत्रक. बाबत तक्ता. | |
| **५०** | १४-१२-२००५ | ५ | अहमदनगर शहर हद्दीमधुन एम.आय.डी.सी.चा भाग ( नागापुर सर्व्हे नंबर ९ ते २१ ) वगळणे बाबत मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम,विरोधी पक्ष नेता, मा. श्री.कानडे अशोक नाथा, नगरसेवक, मा.श्री.घुले अविनाश हरिभाऊ नगरसेवक ,मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत , नगरसेवक यांची | ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर शहर हद्दीतुन एम.आय.डी.सी.चा भाग (नागापुर स.नं.९ ते २१ ) वगळणे बाबत हि सभा तत्वत : मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेंत यावा. नियमानुसार कार्यवाही करावी. ठराव बहुमताने मंजुर. सुचक : मा.श्री.सुरेश शेळके. अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | | |
| **५१** | १४-१२-२००५ | ६ | सि.स.नं.६६४ - अ /१ , ६०१५ - अ / १ व वसंत टॉकीजच्या समोरील शासनाच्या मालकीच्या जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. | अ ) ऑफिस रिपोर्ट मंजुर. तदनुषंगीक येणां-या खर्चास मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी. ब ) झारेकर गल्ली रिमांड होम जवळील सार्वजनिक शौचालय या ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासुन आहेत. या जागेवर अलिकडेच प्रसिध्द झालेल्या आराखडयात भाजी मार्केट प्रस्तावित करण्यांत आले आहे. परंतु रस्त्याचे समोर साधारण १०० फुट अमरधाम ते आयुर्वेद उद्यान पर्यंत भाजीमार्केट दर्शविण्यांत आले आहे, याठिकाणी विडी कामगार तसेच मोलमजुरी करणांरे गोरगरीब कुटुंबिय राहतात. याकरीता याठिकाणी शौचालयाची अत्यंत आवश्यकता आहे. सिटी स.नं.४८४२ अ आरक्षण क्रमांक १४४ यामध्ये निम्मीअर्धी जवळ - जवळ ६ ते ७ गुंठे जागा मा.शासनाची असुन ती नियमाप्रमाणे खरेदी करणेंत यावी. तदनुषंगिक खर्च मंजुर .सदर ठिकाणी पुर्वी प्रमाणेच शौचालयाचा वापर करावा. याबाबत हि सभा मान्यता देत आहे.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.सुरेश शेळके. अनुमोदक मा.श्री.बहिरनाथ वाकळे. | |
| **५२** | १४-१२-२००५ | ७ | अहमदनगर शहराचे दुसरी सुधारित विकास योजनेमधील ई. पी. म्हणुन दर्शविलेल्या आरक्षणा बाबत आक्षेप नोंदविणे बाबत १. मा.श्री.सुरेश शेळके, सभागृह नेता २.मा.श्री.कैलास गिरवले ३. मा. श्री.संजय चोपडा ४.मा.श्री.अर्जुन दातरंगे ५. मा. सौ.सुनिता मुदगल ६. मा. श्रीमती. पार्वतीबाई सकट ७.मा.सौ.कविता दहिफळे या मा.नगरसेवकांची दि.२-१२-२००५ ची यादी व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव. | महाराष्ट्र शासनाची दुसरी सुधारित विकास योजना दि. ४ जुलै २००५ रोजी अधिसुचना क्र.टीपीएस / १६९९ / १६१२ / सीआर - २७ (सी ) / ०३ / युडी - ९ अन्वये मंजुर केली आहे.<br>तथापि या मंजुर विकास योजनेतुन एकुण ६२ विभाग वगळलेले असुन त्यामधील प्रस्तावाबाबत पुन्हा हरकती सुचना मागवलेल्या आहेत.<br>त्यापैकी खाली ईपी बद्यल ही महासभा हरकत सुचना देत आहे.<br><br>१ \| ई पी - १ \| नव्याने नमुद १२.०० मी.रूंदीच्या पुर्व पश्चिम रस्ता वगळण्यांत यावा.<br>२ \| ई पी - ७ \| आरक्षण क्र. ४३ खेळाचे मैदान व आरक्षण क्र.४४ - आरक्षित शाळा ही आरक्षणे वगळुन रहिवास विभागात समाविष्ट केलेली आहेत. त्याऐवजी आता ही आरक्षणे पुर्वीप्रमाणेच ठेवणेंत यावीत.<br>३ \| ई पी \| वाणिज्य विभाग क्र. २ (Commercial District ) हा विभाग वगळुन ही जागा शासनाने रहिवास विभागात समाविष्ट करण्यांचा | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | - ४० प्रस्ताव आहे. हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताविरोधी असुन त्यामुळे महानगरपालिकेचे कधीही न भरून येणांरे नुकसान होणांर आहे. महत्वाच्या भागातील सुमारे ७ एकर क्षेत्र मिळण्यांपासुन महानगरपालिका वंचित होणांर आहे. सबब हा प्रस्ताव पुर्वीप्रमाणेच ठेवणेंत यावा.<br>४ ई पी - ४४ आरक्षण क्र.१६५ व १६६ अन्वये स्टेडीयम व पार्क साठी आरक्षित जागेमध्ये दुकानकेंद्र नव्याने सुचविले आहे. सदर जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्यांने दुकानकेंद्रास महानगरपालिकेची तीव्र हरकत आहे.<br>५ ई पी - ४६ मंगलगेट येथील अस्तित्वात असलेले मटन मार्केट पाडुन त्याठिकाणी एकात्मिक शहर विकास योजने अंतर्गत मटन मार्केट उभारण्यांचा प्रस्ताव निविदा निश्चीत करण्यांचे स्तरावर असुन त्यास ई पी - ४६ अन्वये भाजी मार्केट दर्शविले असल्यांने प्रकल्प अडचणीत आलेला आहे. त्यामुळे त्याठिकाणी पुर्वीप्रमाणेच मटन मार्केट व फिश मार्केट ठेवणेंत यावे.<br>सुचक : मा.श्री.सुरेश शेळके अनुमोदक : मा.श्री.बहिरनाथ वाकळे<br>ठराव सर्वानुमते मंजुर. | |
| **५३** | १४-१२-२००५ | ८ | महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स इंडिया प्रा.लि.लातुर या खाजगी संस्थेला मौजे बुरुडगांव स.नं.३४ ( पैकी ) या अहमदनगर महानगरपालिकेच्या जागेवर ओल्या कच-यापासुन सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रकल्प बी.ओ.टी.तत्वावर चालविणेंस देणें बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. | ऑफिस रिपोर्ट मंजुर.नियमानुसार कार्यवाही करावी. ठराव बहुमताने मंजुर.<br>सुचक : मा.श्री.संजय चोपडा.अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे. | |
| **५४** | १४-१२-२००५ | ९ | बुरुडगांव सर्व्हे नं.३४ ( पैकी ) कचरा डेपो येथील २००० चौ.फुट जागा सुका कचरा निवडणेसाठी व साठवणुक करणेसाठी कागद, काच, पत्रा,कष्टकरी पंचायत पुणे यांना | ऑफिस रिपोर्ट मंजुर.तद्नुषंगिक खर्च मंजुर.नियमानुसार कार्यवाही करावी.<br>ठराव बहुमताने मंजुर.सुचक : मा.श्री.मिलिंद गंधे.अनुमोदक : मा.श्री.संजय चोपडा. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | देणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. | | |
| **५५** | १४-१२-२००५ | १० | अहमदनगर महानगरपालिकेची शाळा नंबर ११ ची इमारत ही मा.न्यायालयासाठी तात्पुरत्या कालावधीसाठी देणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. | मनपा शाळा नंबर ११ मध्ये शिक्षण मंडळाचे कार्यालय आहे. जुने रेकॉर्ड आहे. त्यामुळे सदर जागेऐवजी झेंडीगेट येथील शाळा मा.न्यायालयास देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार कार्यवाही करावी. ठराव बहुमताने मंजुर.सुचक : मा.श्री.कैलास गिरवले.अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे. | |
| **५६** | १४-१२-२००५ | ११ | बेळगाव महानगरपालिका बरखास्ती बाबत कर्नाटक सरकारचा निषेध करणेंबाबत मा.श्री.संजय चोपडा, नगरसेवक यांची दि.५-१२-२००५ ची यादी. | बेळगांव महानगरपालिका बरखास्त करणेबाबत कर्नाटक शासनाचा ही सभा निषेध करीत आहे. तरी सदरच्या भावना कर्नाटक शासनांस पाठविण्यांत याव्यात.सुचक : मा.श्री.संजय चोपडा.अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके. | |
| **५७** | १४-१२-२००५ | १२ | महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांचेकडुन विविध योजनांसाठी असलेला निधी अहमदनगर महानगरपालिके करीता उपलब्ध करुन घेणेंसाठी इतर महानगरपालिके मधुन निवृत्त झालेल्या आयुक्त दर्जाच्या अधिका-याची नेमणुक करणेंबाबत १.मा.श्री.अभय आगरकर, नगरसेवक २.मा.श्री.सुरेशराव शेळके,सभागृह नेता ३.मा.श्री.दिपकराव सुळ,नगरसेवक ४.मा.श्रीमती.इंदुबाई प.बोरुडे,नगरसेवक यांची दि.६-१२-०५ रोजीची यादी. | अहमदनगर शहराच्या विकासासाठी मा.राज्य शासन व केंद्र शासन यांचेकडुन वेगवेगळया प्रोजेक्टवर निधी आणणेसाठी व त्यानुसार काम करून घेण्यां --साठी इतर मनपा मधुन निवृत्त झालेल्या आयुक्त दर्जाच्या अधिका-याची सदर कामी नेमणुक (मानधनावर) करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी.खर्च मंजुर. ठराव बहुमताने मंजुर.सुचक : मा. श्री. दिपक सुळ.अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर. | |